# नाशिक त्र्यंबकेश्वर पत्रकार हल्ला प्रकरणात गुंडांना कठोर शासन करा; पत्रकार संरक्षण कायद्याबाबत सरकारने भूमिका जाहीर करावी - रतनकुमार साळवे



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर झालेल्या निर्घृण हल्ल्याने महाराष्ट्रातील लोकशाहीची गळचेपी सुरू झाल्याचा गंभीर आरोप करत पत्रकार संरक्षण कायद्याची मागणी पुन्हा एकदा तीव्रतेने समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत निवेदन दिले. त्यात त्यांनी म्हटले की, ङ्गहा हल्ला केवळ गुन्हा नाही, तर लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर केलेला घाव आहे. पत्रकारांवर हल्ला करणारे गुंड कोणाच्या छत्रछायेखाली हिंडत आहेत, हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्र विचारतो आहे.

यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष रतन कुमार साळवे म्हणाले की, सरकारने या घटनेवर गप्प राहण्याऐवजी तातडीने कडक पावले उचलावीत. पत्रकार योगेश खरे, अभिजीत सोनवणे, किरण ताजणे यांच्यावर हल्ला करणाऱ्यांना ताबडतोब जेरबंद करून कठोर शिक्षा दिली नाही, तर पत्रकार हा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन उभारेल.

पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले रोखण्यासाठी सरकारने पत्रकार संरक्षण कायदा तातडीने लागू करावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. तसेच या संदर्भात सरकारची भूमिका स्पष्ट करणारी श्वेतपत्रिका जाहीर करावी, अन्यथा राज्यभर भव्य आंदोलन पेटवले जाईल, असा इशारा साळवे यांनी दिला. यावेळी रशपाल सिंगअट्टल, ज्ञानेश्वर खंदारे,संजय सोनखेडे, रूपचंद गाडेकर, मनीष अग्रवाल, बाजीराव सोनवणे, शेख शफीक,नजीमोद्दीन काजी, अविनाश पहाडे, राज ठाकरे,सुरेश शिरसागर, नदीम सौदागर, विजय सोनवणे, प्रकाश खजिनकर आदी संपादकासह पत्रकारांची उपस्थिती होती.

# मिर्झा शाहिद बेग मिर्झा यांचा प्रभागातील मित्रमंडळीकडून भव्य सत्कार



**जिंतूर प्रतिनिधी :** मेराजोदीन सिद्दीकी सर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्या बद्दल नगरसेवक मिर्झा शाहिद बेग मिर्झा व प्रभागातील मित्र मंडळीकडून भव्य दिव्य शानदार सत्कार करण्यात आला.

यावेळी शाहिद बेग मिर्झा, बाबू भागुत्तेदार, सय्यद मुसा भाई... मुखिद पहिलवान, सय्यद बरकत भाई , जुनेद भाई, सत्तार भाई, अफसर खान, अब्दुल वासिम, एजाज भाई, युनुस कच्ची, मुजीब खान, एजाज कुपटेकर, अरशद बेग व असंख्य प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थित होती.

# कर्णपुरा दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मौल्यवान वस्तू घालून येवू नये...!

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांचे आवाहन

**दिनेश परदेशी छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगरची ग्रामदेवी कर्णपुरा मातेची नवरात्रोत्सवामुळे यात्रा भरली आहे. त्याच पार्श्वभूमीवर संपूर्ण यात्रा परिसरात पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवल्याचे दिसून येते. छोट्या मोठ्या चोऱ्या, चपट्या सुरूच



आहेत. मोबाईल चोर तर अत्यंत शिताफीने मोबाईल उठवून नेत असल्याचे दिसून येत आहे. मंदिराच्या लगतच पोलिस चौकी तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेली आहे. तेथून ही लक्ष केंद्रीत करण्यात येत असल्याचे दिसून आले.

यावेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीणा यादव यांना बंदोबस्ताबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की,खास करून महिलांनी आपले मौल्यवान वस्तू तसेच दागदागिने न घालून येता आर्टिफिकेशियल वस्तू घालून दर्शनासाठी आले पाहिजे.

तसेच आपल्या मोबाईल, पर्स व इतर वस्तूंची काळजी घेतली पाहीजे. महिलांची व पुरूषांची रांग वेगवेगळी आहे. यामुळे रांगेत व शिस्तीत दर्शन घ्यावे, जेणे इतरांनाही त्रास होणार नाही. दुर्गामातेची मनोभावे आराधना करा शक्तीचे रूप आहे. तसेच राक्षसाचा व वाईट वृत्तीचा नाश करणारी आहे. त्यामुळे आपणही आपल्यातील ज्या वाईट बाबी असतील त्यांचा नाश केला पाहिजे. कोणालाही आपल्यापासून त्रास होणार नाही. छेडखानी होणार होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. आपल्या वाईट अवगुणाचे दहन केले पाहिजे. राक्षण दहन केले पाहिजे. तसेच पोलिस हे आपल्या सेवेसाठी चोवीस तास तैनात आहेत. आमचे सहकार्य नेहमीच तुम्हाला आहे. तुमचेही सहकार्य आम्हाला लाभावे. नवरात्रोत्सव व विजयादशमीच्या सर्व भाविक भक्तांना मनपूर्वक शुभेच्छा मी देते असे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी अट्टलमतशी बोलतांना सांगितले.

# तोतया लष्करी महिला जवानाच्या पोलिस पथकाने मुसक्या आवळल्या



**छत्रपती संभाजीनगर :** लष्करातील जवान असल्याचे भासवत एका तरुणीने कर्णपुरा मंदिरात थेट प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याने चांगलीच खळबळ उडाली. पोलिसांनी तातडीने धाव घेत हा तरुण ताब्यात घेवून बनाव उघडकीस आणला. मंगळवारी (ता. २३) सायंकाळी पाचच्या सुमारास ही घटना घडली. त्याच्यावर छावणी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपीचे नाव लहू नामदेव राऊत (वय २१, रा. सोमवाडी, ता. पैठण) असे असून तो लष्कराच्या गणवेशासारखा टी-शर्ट, जॅकेट, टोपी व जवान वापरतात तसे बूट परिधान करून आला होता. ती रांग सोडून थेट मंदिराच्या गाभाऱ्यात घुसून पूजा करण्याचा हट्ट धरत होता.

त्याच्यावरील संशय वाढल्याने यावेळी मंदिर परिसरात बंदोबस्तासाठी तैनात असलेली महिला पोलीस कर्मचारी सविता खराटे विचारपूस करत तिचा परदाफाश केला. तोंडाला मास्क बांधले होते. मास्क काढण्याचा हट्ट पोलीस कर्मचाऱ्यांनी धरला असता मात्र पोलीस निरीक्षक प्रवीण यादव यांनी त्याला वाहनात नेले असता तेथेच त्याने मास्क काढल्यावर त्याचा खरा चेहरा समोर आला. तो म्हणजे पुरूषाचा तसेच त्याला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी छावणी पोलीस ठाण्याचे प्रभारी डॉक्टर विवेक जाधव यांच्या स्वाधीन केले आहे.

या कारवाई यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी वेदांत नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली, क्रांती चौक पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दीपक पाटोळे, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विनोद अबुज, पोलीस उपनिरीक्षक भगवान मुजगुले, सहाय्यक फौजदार रवींद्र घायवट, म.पो.अं. उमा पिंगट, शांताबाई बनसोडे, सविता खराटे, छाया दहिजे, पोलीस अंमलदार प्रकाश वाघ, संदीप लागड, अजय व्यवहारे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# फुलंब्रीत आमदार अनुराधा चव्हाण यांच्या कार्यकर्त्यांनी माझा फोटो वृत्तपत्र जाहिरात आणि बॅनरवर वापरणे थांबवावे - मुख्य अभियंता अतुल चव्हाण

**दिनेश परदेशी छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सध्या जिल्ह्यात चर्चा सुरू आहे ती म्हणजे मुख्य अभियंता या पदावर असलेले अतुल चव्हाण यांनी लिहिलेल्या आपल्याच पत्नी तथा आमदार अनुराधाताई चव्हाण यांना लिहिलेल्या पत्राची. यापूर्वीही अनेकदा ही बाब घडली आहे की, बॅनरवर अतुल चव्हाण यांना काका असे संबोधले जाते. त्यांचे छायाचित्र वापरले जायाचे मग आता असे काय झाले की, त्यांना पत्र लिहिण्याची गरज पडली. त्यांनी यापूर्वीही विरोध केला असता. परंतु आता अचानकच कसे काय?

आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त यांच्याबरोबर फिरणारे कार्यकर्ते यांनी तर आपल्या कॉलनीत, एरियात मोठ मोठे बॅनर लावले होते. त्यात आमदार अनुराधाताई यांच्या छायाचित्राबरोबरच अतुल चव्हाण यांचे छायाचित्र असायचे. त्याचवेळेस का नाही बोलले नाही.

तर त्याचे उत्तर आहे. आता अतुल चव्हाण यांना स्वत:ला सामाजिक कार्यकर्ते म्हणवून घेणारे माहितीचा अधिकार स्पेशालिस्ट अर्ज करून याबाबत असलेले नियम, वगैरे वगैरे यांची माहिती मागवणारे अर्ज करत असल्याची चर्चा सार्वजनिक बांधकाम विभागात फेरफटका मारला असता लक्षात आली.





वृत्तपत्रात फुल पेज जाहिरातींवर फोटो

अन् पत्र लिहिण्याचे खरे कारण समोर आले. हे कारण समोर आले नसते तर हे असेच चालले असते. तसेच त्याचा उल्लेखही त्यांनी लिहिलेल्या पत्रात केला आहे. परंतु एका मोठया व जबाबदार पदावर असणाऱ्या अधिकाऱ्याने एका राजकीय व सत्तेत असलेल्या पक्षाच्या आमदारांच्या बॅनरवर आपला फोटो चमकवणे तसे चुकीचेच आहे.

कार्यकर्त्यांना तर वेळीच आवार घालायला पाहिजे. धार्मिक कार्यक्रम, सामाजिक कार्यक्रमाअंतर्गत तसेच मोठ मोठ्या वृत्तपत्रात फुल पेज जाहिरातीं वर देखील छायाचित्र छापले गेले आहे. त्याच्या दुसऱ्या दिवशीच पत्र लिहिले असते तर काही वाटले नसते परंतु अचानक १० ते १२ दिवसांनंतर

**मागील वर्षी अनुराधाताई चव्हाण यांनी वाढदिवसावर पोस्टर बॅनर जाहिराती यावर खर्च न करता शाळांमध्ये मुलींच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे दिले होते. परंतु यावर्षी मात्र अति उलट झाले. प्रचंड खर्च करण्यात आल्याचे दिसून आले.**

त्यांच्यावर पत्र लिहिण्याची गरज पडली. असो. उशीरा का असेना परंतु माहितीच्या अधिकाराअंतर्गत सर्व स्पष्ट होवू नये तसेच अजून अर्जांचा भडीमार होवू नये म्हणून बहुतेक हा राजकीय संवाद साधण्याची त्यांना गरज पडली. त्यांच्या स्वभावाप्रमाणेच त्यांच्या पत्रात भाषाशैली पूर्णतः नम्र व सन्मानपूर्वक ठेवण्यात आली आहे हे विशेष.



E-Mail: aurangabad.ce@mahapwd.com Ph.No.(०२४०)२३३१८१५, २३३१६१६, Fax-२३३२०६८

जा.क्र. मु.अ/का.४/रा.अ/ ३१३९ दि. 26 SEP 202

प्रति,
मा. आ. अनुराधा अतुल चव्हाण,
विधान सभा सदस्य,
फुलंब्री विधान सभा.
जि. छत्रपती संभाजीनगर

विषय- अतुल भि. चव्हाण,मुख्य अभियंता यांचे छायाचित्र (फोटो) विविध वृत्तपत्रात तसेच बॅनरवर प्रसिध्द न करणेबाबत.

मा. महोदया,

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, आपल्या फुलंब्री मतदार संघातील कार्यकर्ते हे माझे (अतुल भि. चव्हाण) छायाचित्र (फोटो) विविध वृत्तपत्रात तसेच बॅनरवर प्रसिध्द आहेत. त्यामुळे माझ्या विरुध्द तक्रारी तसेच माहिती अधिकार अर्ज या कार्यालयास प्राप्त होत अ

तरी, आपणांस विनंती करण्यात येते की, माझे छायाचित्र (फोटो) विविध वृत्तपत्रात बॅनरवर प्रसिध्द न करण्याबाबत आपल्यास्तरावरुन आपल्या मतदार संघातील कार्यकर्त्यांना देण्यात याव्यात, अशी आपणांस विनंती आहे.

आपला विश्वासू
(अ.भि. चव्हाण)
मुख्य अभियंता

प्रत- जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक, मुख्य अभियंता सा.बां. प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.

**हेच ते पत्र**

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199